# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ३२** // **स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त** //**(पुढे ढकलण्यात आलेल्या)** **दिनांक.२२/०५/२०२०**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २०/०३/२०२० शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता (पुढे ढकलण्यात आलेल्या) स्थायी समितीची सभा जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २२/०५/२०२० शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

मा. ॲड.सौ.हाडा शुचिता अतुलसिंह, सभापती तथा पिठासीन अधिकारी

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | देशमुख प्रतिभा गजानन |
| पोकळे दिलीप बबनराव | काळे रेश्मा कुंदन |
| खडके सुनिल वामनराव | लढढा नितीन बालमुकुंद |
| सनकत चेतन गणेश | भंगाळे विष्णु रामदास |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बरडे नितीन मनोहर |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |
| पाटील राजेंद्र झिपरु | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिष कुलकर्णी, मा.उपायुक्त, श्री.मिनीनाथ दंडवते, उपायुक्त, आरोग्य विभाग, श्री.कपील पवार,मुख्यलेखा अधिक्षक, श्री.संतोष वाहुळे,मुख्यलेखा परिक्षक, श्री.पवन पाटील,सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे,सहा.आयुक्त व श्री.सुनिल गोराणे, नगरसचिव उपस्थित होते.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य श्री.ढेकळे सदाशिव गणपत व श्री.कोल्हे प्रविण रामदास यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे .

(वंदेमातरमने सभेला सुरुवात झाली )

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजाची सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य श्री. कोल्हे प्रविण रामदास व श्री.पाटील राजेंद्र झिपरु यांचा रजेचा अर्ज आलेला असून तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २३९ पारित करण्यात आला.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.चेतन गणेश सनकत | भारत देशामध्ये कोरोना संसंर्गचा प्रादुर्भाव वाढलेला असून सदर संसंर्ग आटोक्यात आणण्याकामी व त्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना अंमलबजावणी करणे कामी सेवा बजावणारे सर्व साफ-सफाई कर्मचारी, पोलिस, डॉक्टर, नर्स व आशा वर्कर हे सदरचे काम करताना शहीद झालेलेबद्दल श्रध्दाजंली. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त् दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्व्र इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त् कुटूंबियांचे दु:खात संपुर्ण सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४० पारित करण्यात आला.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | श्री.नितीन बालमुकुंद लढढा | सदया संपुर्ण भारत देशामध्ये कोरोना संसंर्गचा प्रादुर्भाव वाढलेला असून सदर संसंर्ग आटोक्यात आणण्याकामी व त्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजना अंमलबजावणी करणे कामी आपले डॉक्टर, नर्स, आशा वर्कर, सर्व साफ-सफाई कर्मचारी तसेच आपले महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी हे दिवसरात्र प्रामाणिकपणे काम करीत असलेबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |
| २ | श्री.विष्णू रामदास भंगाळे | कोरोना संसर्गमुळे गेल्या दोन अडीच महिन्यापासून आपल्या महापालिकेत एकही सभा झाली नाही परंतू आता आजरोजी जी सभा या सभागृहात संपन्न होत आहे त्याकामी सर्व सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे सुरक्षाकामी नगरसचिव व त्यांचे सर्व कर्मचारी वर्ग यांनी सभागृहात सर्व सदस्य व अधिकारी वर्ग यांचेकरिता सॅनिटायझर, माक्स, हॅण्डग्लोज तसेच सर्व सभागृहात जंतूनाशक फवारणी इत्यादी उपाययोजना करुन जे प्रामाणिकपणे व कौतुकास्पद असे काम केलेबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन. |

**मा.सभापती :-** सर्व वृत्तपत्राचे छायाचित्रकारांना सुचना आहे की, या मिटींग मध्ये आपण सोशल डिस्टंसिंगचे पालन करतो आहे. आणि त्यामुळे आपण गर्दी टाळण्याच विचार केलेला आहे. त्यामुळे आपण सभेच्या सुरुवातीलाच फोटो काढुन घ्यावे आणि त्यानंतर कृपया बाहेर थांबाव. मिटींग संपल्यानंतर आम्ही तुम्हाला मिटींगबाबत सर्व माहिती देऊ. आणि विरोधी पक्षाचे नेते ही सेभेच्यानंतर त्यांची प्रतिक्रिया देतील. मा.आयुक्त साहेब व सर्व सन्मा.सदस्य, जगभरात कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव सुरु आहे. त्यावर शासन व महानगरपालिका स्तरावर उपाययोजना करीत आहे. खबरदारीचा उपाय म्हणुन दि.२०/०३/२०२० पासुन स्थायी समितीची सभा घेण्यात आलेली नाही. कोरोनाची सुरु वातच झालेली होती त्यावेळेला, या आजार बद्दल आपल्याला फारशी माहिती नव्हती. आपण सर्वेच गोंधळलेल्या परिस्थितीत होते. आणि खबरदारीचा उपाय म्हणुन आपण ती सभा तहकुब केलेली होती. आता साधारणपणे या संकटेतुन आपण सर्वेच जात आहोत. आप आपल्या स्तरावर या संकटाचा सामना करणेचे आपण प्रयत्न करीत आहोत. मा.कक्ष अधिकारी, नगरसविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.०३/०४/२०२० चे पत्रानुसार महानगरपालिका मधील विविध समित्यांच्या नियमित सभा घेणेबाबत त्या त्या महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा असे पत्र मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी व मा.आयुक्त, महानगरपालिका(सर्व) यांना निर्गमित केलेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात मुंबई, पिंपरी - चिंचवड, कल्याण-डोंबिवली, सांगली मिरज, कुपवाडा, मिरा-भाईंदर, कोल्हापुर, नाशिक, पुणे, नागपुर, धुळे, मालेगांव, चंद्रपुर, ठाणे इत्यादी महानगरपालिकांनी या सद्यास्थितीत स्थायी समितीच्या सभा घेतलेल्या आहेत /आयोजीत केलेल्या आहेत. ज्याला आपण लॉकडाऊन पिरयेड म्हणत आहोत. या काळात या सभा झालेल्या आहेत. सर्व साधारण जे नियम आहेत ते आपण सभा कामकाजामध्ये पाळले पाहिजे. कारण या आजारावर सदयातरी कुठलेही औषध नसल्यामुळे सोशल डिस्टंसिंग हा एकच पर्याय सदया आहे. त्यानुसारची सर्व काळजी आपण आजच्या सभेमध्ये घेतलेली आहे. प्रशासनास तशा लेखी सुचना दिलेल्या होत्या. विषयपत्रिकेवरील जेवढे विषय आहेत त्या संबंधीत विभागाचे अधिकारी यांनाच

सभेत बोलविले आहे. अशारितीने अनावश्यक गर्दी टाळलेली आहे. कोरोना संबंधित आज सभा असल्याने प्रशासकीय इमारतीचे प्रांगण व परिसर जेटींग मशिनद्वारे फवारणी करण्यात आलेली आहे. तसेच पहिला व दुसरा मजला सभागृहासह संपुर्ण जंतुनाशकाद्वारे फवारणी करण्यात आलेला आहे. संपुर्ण सभागृहात सोशल डिस्टंसिंग नुसार बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. या सभागृहातील कार्यरत शिपाई यांना हॅण्डग्लोज देण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांनी हॅण्डग्लोज घातलेले आहेत. कर्मचारी संख्या सुध्दा कमी केलेली आहे. चहा आपण बोलवलेला नाही. तसेच सभागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ स्वतंत्र कर्मचारी सॅनिटायझर स्प्रे करुन सभागृहात प्रवेश देत असुन सर्वांना मास्क कंम्पलसरी करण्यात आलेले आहेत. साऊंड सिस्टिम वरील कर्मचाऱ्यांना सुध्दा हॅण्डग्लोज देण्यात आलेले आहेत. कोरोना संसर्ग प्रतिबंधाबाबत सभागृहात सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आलेली आहे. या सगळया खबरदारीच्या उपाययोजना करुन आपण आजची सभा घेतलेली आहे. सगळया सदस्यांना सुध्दा माहिती व्हावी म्हणुन माझी ही छोटीशी प्रस्तावना होती कारण ही सभा नियमानुसार व सर्व काळजी घेऊन शासनाने जे जे निर्देश दिलेले आहेत त्या सगळयांचे पालन करुन ही सभा आयोजित केलेली आहे.

तरी सर्व सन्मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांनी सोशल डिस्टंसिंगचे पालन करुन सहकार्य करावे ही विनंती.

**श्री.नितीन बरडे :-** अध्यक्ष महोदया, आपणास विनंती आहे की, तीनच पत्रकार आहे. तर त्यांना आत बसु द्यावे. तीनच आहे. लोकमत, दिव्यमराठी आणि सकाळ, तीनच लोकं आहे. खुर्च्या खाली आहे पत्रकार बसतील फोटोग्राफर बाहेर राहतील. आणि खुर्च्या खाली आहे आणि दुरवर आहे. आपल्या विरोधात बातम्या जायला नको.

**मा.सभापती :-** खुर्च्या तर खाली राहणारच नितीन भाऊ, सभागृहाची उपस्थिती जास्त आहे, आणि आपण शक्यतो तेवढी संख्या कमी ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि आपण खबरदारीचा उपाय म्हणुन त्यांना बाहेर ठेवलेल आहे. आणि बाहेर आपण दोन्ही ही पक्ष आपआपली बाईट देणार आहोत या मला नाही वाटत यात काही अडचण असु शकते.

**श्री.नितीन बरडे :-** पत्रकार कोणा करीता आहे ? तीनच जण आहे.

**मा.सभापती :-** आपण सेपरेटली बाईट देत आहोत त्यांना. आपल्याला जितकी संख्या कमी करता आली तितकी संख्या आपण कमी केलेली आहे.

**श्री.भगतराम बालाणी :-** मा.अध्यक्ष महोदया, माझी विनंती आहे, जे विषय आलेले आहे त्यांच्यावर चर्चा करु. सत्ताधारी असो किंवा विरोधीपक्ष असो त्यांची जरुर मांडावा. परंतु विषयपत्रिकावरचे जे विषय आहे त्यांना धरुनच बोलावा. पहिले विषयपत्रिकाचे विषय होऊ द्या. मगच बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज आपण पाहत आहोत की, कोरोनाच्या भितीमुळे घरातील लोक घरातीलच लोकांपासुन दुर आहे. परंतु अश्या परिस्थितीत सुध्दा आपले डॉक्टर्स असतील, डॉक्टरच्या हाताखालील आया असतील, आशा वर्कर असतील, आपले स्वच्छता कर्मचारी असतील हे सर्व दिवसरात्र एक करुन प्रामाणिकपणे काम करीत आहेत. त्यांचा मी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे. तसेच आपले महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपायुक्त असतील, आयुक्त साहेब असतील, जेव्हढी जोखीम खालच्या कर्मचाऱ्याला आहे तेव्हढीच जोखीम वरीष्ठ अधिकाऱ्यांना सुध्दा आहे. सगळे आपले जिवनाचा विचार बाजुला ठेवुन रात्रीचे १२.०० वाजलेले असो की, २.०० वाजलेले असो की, सकाळचे ५.०० वाजलेले असो. आपल्या कर्तव्यात कुठलीही कसुर न ठेवता, रात्रंदिवस त्या सामान्य जनतेच्या हिताच्या रक्षणासाठी ते झिजत आहे. या संपुर्ण यंत्रणेच अभिनंदन आपण या सभागृहात पारित करु या. जेणे करुन काम करणेस त्यांचा सुध्दा मनोबल वाढेल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपल्या सुचनेस स्वागत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** कोरोना महामारी मुळे पुर्ण देशात जे बळी पडलेले नागरीकांची संख्या आहे. आणि जे सैनिक कर्तव्य बजवत आहे. पोलिस कर्तव्य बजवत आहे. असे सफाई कर्मचारी कर्तव्य बजवत आहे. असे संपुर्ण हिंदुस्तान मध्ये काही काही ठिकाणी जे सफाई कर्मी, पोलिस कर्मी हे शहीद झालेले आहे असे मी माणतो, त्यांना आपण श्रध्दांजली ही मांडायला पाहिजे असे माझे मत आहे.

**नगरसचिव:- विषय क्र १)** दि.११/०२/२०२० रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे, दि.१५/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित स्थायी समिती सभेचे तसेच दि.१५/०२/२०२० रोजी दुपारी ०४.०० वाजता संपन्न झालेल्या तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.रेश्मा काळे :-** मान्यता देण्यात येत आहे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.११/०२/२०२० रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे, दि.१५/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित स्थायी समिती सभेचे तसेच दि.१५/०२/२०२० रोजी दुपारी ०४.०० वाजता संपन्न झालेल्या तहकूब स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- काळे रेश्मा कुंदन**
**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव:- विषय क्र २)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०७ मध्ये सर्व्हे नं.७४८६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान विकसीत करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ३.३३% कमीचे दरास व रक्कम रु.२८,९७,२५२/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** न्यायालयाच्या निकालास अधिन राहुन व सर्व प्रशासकीय बाजु तपासुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** अधिकाऱ्यांनी याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :-** प्रशासनाने याची माहिती संपुर्ण सभागृहाला अवगत करावी.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** आंबेडकर उद्यान आपण २००९ ला मेनटेनंस करीता जेष्ठ नागरीक संघ यांना आपण दिलेल होत. ज्या अटीशर्ती त्यांना ठरुन दिलेल्या होत्या. त्या अटीशर्तीचा त्यांनी भंग केलेले असल्यामुळे आपण ठराव केलेला होता. आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने त्याला आपण टर्मिनेट करण्याच्या संदर्भात नोटीसा देत होते. तो कोर्टात गेलेला होता. कोर्टात जाऊन त्यानी स्टे आणलेल आहे. परंतु मध्यंतरी खासदार साहेबांनी आपल्याला निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्या ठिकाणी पाथवे तयार करणेच्या संदर्भात. त्या प्रमाणे निविदा कार्यवाही झालेली आहे. आता लेटेस्ट अस झालेल आहे दोन मिनिटापुर्वी माझ्या टेबलावर फाईल आली की जो कोणही एजन्सी गेलेली आहे कोर्टात त्यांनी राईटींग मध्ये दिलेले आहे. माझी या कामात काही हरकत नाही म्हणुन, आता मी ते आपले वकील साहेबांकडे पाठवुन त्यांचा अभिप्राय मागुन घेतो.

**मा.सभापती :-** वकीलांचा अभिप्राय आलेला आहे का आपल्याकडे,

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** नाही, फक्त पत्र आलेला आहे त्या एजन्सीचा, त्यांचे सहीने की माझी कुठली ही हरकत नाही.

**मा.सभापती :-** त्या पत्राची परत आहे का आपल्याकडे आता.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** हो आहे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदया, ज्याला ही एजन्सी दिलेली होती. आणि त्या एजन्सीला महानगरपालिकेने टर्मिनेट केल्यानंतर ती एजन्सी कोर्टात गेलेली होती. आपल्याच जागेची आपल्यालाच एन.ओ.सी. देणारा तो कोण. या निविदेला जशी स्थगिती आहे त्या अनुषंगाने कोर्टाने निर्णय दिलेला आहे.

**मा.सभापती :-** आपल्या उद्यानाला अशी एन.ओ.सी. घ्यायची गरज भासते का ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** मॅडम मी एकदा विधीतज्ञ यांच्याशी बोलेलो होतो. त्यांनी सांगितले की, कोर्टाचा स्टे हटविल्या शिवाय आपल्याला हे करता येणार नाही. परंतु जर त्यांनी ॲब्जेक्शन मागे घेतल तर विचार करता येईल. आणि आता त्यांनी पत्र दिलेल आहे.

**श्री.नितीन लढढा :-** हा, तो पत्र देईल परंतु स्टे कोणही केलेला आहे. कोर्टाने. स्टे कोर्टाने दिलेला आहे परंतु मक्तेदाराची एन.ओ.सी. घेऊन आपण काम सुरु कराव की नाही कराव, उद्या कनफर्म कोर्टात जाईल.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ आपण काम सुरु करायला हरकत नाही. आणि न्यायालयाच्या निर्णयाला अधिन राहुन आपण प्रशासनाचा प्रस्ताव मान्य केलेला आहे. प्रशासनाने न्यायालयाच्या निर्णयाला अधिन राहुन पुढील कार्यवाही करायची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** काम कोण करेल काम केवढे होईल त्याबद्दल वाद नाही. परंतु आज जवळपास २८-३० लाख रुपयांचा निधी, या अनुषंगाने दुसरे कामे प्रस्तावीत केली कमीतकमी ते कामे मार्गी तरी लागतील. अन्यथा हा निधी असाच प्राप्त होऊन पळेल आणि व्यपगत होईल चालला जाईल. जर मेन टाईम मध्ये नाही युटीलाईज झाला तो निधी तर त्याची जबाबदारी कोण घेईल.

**मा.सभापती :-** कसं असत नितीन भाऊ एखाद्या कामासाठी आपण निधी आणत असतो. त्याची आपल्याला ही माहिती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निधी खर्च करण्यास आक्षेप नाही परंतु निधी विहीत मुदतीत खर्च व्हायला पाहिजे हे माझा सांगण्याचा तातपर्याय आहे.

**मा.सभापती :-** याची गॅरंटी काय ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** तस काही सांगता येत नाही. सद्या लॉकडाऊन असल्यामुळे तारीख मिळु शकत नाही.

**मा.सभापती :-** कोर्टाचे आता लवकरात लवकर कामे सुरु होत आहे. ऑनलाईन पिटीशन ही सुरु झालेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २८ लाख रुपयांचा निधी, दोन मोठे उद्याने आपण लोक सहभागातुन विकसीत केली. अश्या पध्दतीने त्या भागातील जी मोठी मंडळी आहे. तेथे सामाजिक सी.एस.आर. पध्दतने उद्यानाचे विकास कामे करु शकतात. हा निधी दुसरे काही विकास कामे आपल्या प्रभागातील असतील. जे म.न.पा.खर्चात असतील ते शिफ्ट करावा. आणि दुसरी विकास कामे त्यातुन साद्य करावी. उद्याने जर आपण आज तशी बघीतली तर ती प्राथमिकता नाही. आज आपली प्राथमिकता गटारी आहे रस्ते आहे. या प्रॉपर्टीचा आपण या हक्काच्या निधीतुन पुर्ण करु शकतो आणि हे दुय्यम दर्ज्याचे जे प्राथमिकता आहे ते एखादी एन.जी.ओ.ला हाताशी धरुन किंवा कंपनीला हाताशी धरुन पुर्ण करु शकतात. निर्णय तुम्हाला जे घ्याच असेल घ्या मला काही आक्षेप नाही. आता परिस्थिती आता ४ दिवसापुर्वी मी आयुक्त साहेबांशी बोललो, वित्त विभागाचा पत्र आलेल आहे. वित्त विभागाच्या पत्राच्या अनुषंगाने भविष्यात राज्य शासनाकडुन निधी मिळण्यासंदर्भात खुप काटयावरती कसरत करावी लागेल. १०० कोटीतुन ३० कोटीची ४२ कोटीची जी कामे प्रस्तावीत केलेली आहे त्यापैकी फक्त ५ कोटींचा निधी आलेला आहे. तो उर्वरीत निधी सुध्दा राज्य शासनाकडून मिळेल याची सुध्दा खात्री नाही. अश्या पध्दतीमध्ये आपल्याकडे असलेला एक एक रुपया, हा अत्यंत योग्य पध्दतीने त्याच विनयोग करणे ही जबाबदारी झाली आहे आपली अन्यथा आपल्याला नागरीकांना तोंड देण्याची ही परिस्थिती राहणार नाही. निधी कुठे खर्च करायच हे तुमचा आणि बहुमताच्या अनुषंगाने तुम्ही ठरु शकता. परंतु निधीचा नियोजन जे आहे ते अत्यंत योग्य पध्दतीने व्हावा हीच माझी सुचना आहे आपल्याला.

**श्री.नितीन बरडे :-** ती जेष्ठ नागरीक संस्था कोणाची आहे माहिती आहे का ?

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** आता मला सांगता येणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** आपण म्हणतो आपली जागा आहे. सर्व आपल आहे आपण काही ही करु शकतो. तेथे अनधिकृत कामे चालु आहे साहेब.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अनधिकृत नाही. अनैतिक कामे सुरु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** ते काढायची कोणही जबाबदारी घेत नाही.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** मा.सभापतीताई अध्यक्षांशी बोलाव लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** कोण आहे. आले आहे का ते तुमच्या समोर कोणाच्या. जे आपले वकील साहेब आहे आपले बॉडीचे त्यांनी पत्र दिलेल आहे तुम्हाला, काय दिलेला आहे शेरा, विषय कोर्टात असल्यामुळे हे काम करु नये.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** याच्या बद्दल वकील साहेबांशी बोलण झालेल आहे भाऊ.

**मा.आयुक्त :-** या विषया संबंधी काल मी विभाग प्रमुखांशी बोललो याच्यामध्ये सन्मा.सदस्यांनी जो विषय मांडला की, न्यायालयात असल्यामुळे हा निधी खर्च करणेबाबत याबात स्थायी समिती निर्णय घेवु शकते. परंतु मुळ जो विषय आहे की, ज्या संस्थेला ही जागा मेंटेनन्स करिता दिली होती. त्यांनी अटी-शर्तीचा भंग केला म्हणुन आपण त्यांना कॉन्ट्रक्ट रद्द केला त्यांचे अगेन्स त्यांनी कोर्टात दाद मागीतली. आता न्यायालयामध्ये दाद मागतांना जी स्थगीती दिली आहे ती स्थगीती नेमकी कशाला दिली आहे ते पाहावे लागेल. अडचण येत नसेल तर पर्यायी निर्णय घ्यावा लागेल. याचे करिता माहिती घेणे गरजेचे आहे.

**मा.सभापती :-** प्रशासनाने जो ठराव मांडला होता तो हेच मांडला होता की, प्रशासनाच्या निकालाला अधिन राहुन व सर्व कायदेशीर बाबी तपासुन पुढील कार्यवाही करावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विधी शाखेच मत घेऊन तो प्रस्ताव पुन्हा मांडु शकता.

**श्री.विष्णु भंगाळे :-** न्यायालयाला किती वेळ लागेल सांगता येत नाही. म्हणुन आमच म्हणण एकच आहे. तो निधी त्याच प्रभागामध्ये दुसऱ्या कामासाठी वापरता येईल. त्याची तारीख केव्हा पडेल आणि त्याच्या नंतर ते केव्हा होईल.

**मा.सभापती :-** न्यायालयात दावा दाखल झालेला आहे, परंतु या लॉकडाऊनमुळे विलंब होत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** १० महिन्यापासुन दाखल झालेल आहे ते. मी एकदा बोललो पण होतो.

**मा.सभापती :-** प्रशासनाने न्यायालाचा सर्व बाजु तपासुन उचित कार्यवाही करावी. न्यायालयाच्या निकालाला अधिन राहुन मान्यता देण्यात यावे व कार्यादेश देण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, खासदार क्षेत्र स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०१९-२० जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०७ मध्ये सर्व्हे नं.७४८६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान विकसीत करणे कामास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे कडील पत्र क्रं.जिनिस/खस्थवि/२०१९-२०/प्रमा/संस-३/२९१८ दि.१०/१२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२३/१२/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१६ सन २०१९-२० https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/९६५ दि.०२/०१/२०२० चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमान पत्रात प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहे. मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२९९७०५४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | संदेश ज्ञानदेव टेकाडे | निविदा रक्कमेवर ५% जास्तीने दराने | ३१,४६,९०७/- |
| २ | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रोपा.विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेपेक्षा ३.३३% कमीचे दराने | २८,९७,२५२/- |
| ३ | पद्मालय कंन्स्ट्रक्शन प्रोपा.अतुल जी बाहेती | निविदा रक्कमेपेक्षा १.०५% कमीचे दराने | २९,६५,५८५/- |

मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ३.३३% कमीचे दर आले. सदरचे दर १% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांनी १% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.००६६६७ दि.१७/०१/२०२० चा रक्कम रु.३०,०००/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी येणारा रक्कम रु.२८,९७,२५२/- मात्र खासदार क्षेत्र स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस व सदर दर स्विकृत करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार रक्कम रु.२८,९७,२५२/- मात्र ची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापी प्रशासनाने मे.न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहुन सर्व प्रशासकीय बाबी तपासुन नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव:- विषय क्र ३)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०१/२०२० ते दि.१८/०१/२०२० अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** विषय क्र.३ व ४ ला मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०१/२०२० ते दि.१८/०१/२०२० अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र ४)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३३ दि.२०/०२/२०२० अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत केंद्र शासन पुरुस्कृत अमृत अभियान जळगांव शहराच्या हरीत क्षेत्र विकास प्रकल्पाच्या जागेस कंपाऊंड (चेनलिंक फेन्सींग) करणे कामी प्रभाग क्र.०७ अंतर्गत जळगांव शिवार स.नं.२८० (न.भू.क्र.८३९९) गजानन कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार श्री.प्रविण काशिनाथ राणे यांचे निविदा रकमेपेक्षा ०.२१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१८,०८,३७९/- मात्र खर्चाची संविदा.

२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३४ दि.२७/०२/२०२० अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत स्वच्छ भारत अभियान करिता ५०% अनुदानातुन जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण अंतर्गत फुकटपुरा येथील सार्व.शौचालयाची दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेइतकेचेच दर सर्वात कमीचे स्विकारुन रक्कम रु.१२,७८,२७१/- मात्र खर्चाची संविदा.

३.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१३५ दि.०२/०३/२०२० अन्वये नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०४ मधील आर.एल.शॉप ते हनुमान मंदिर ते पंडीत जमुनाधरजी त्रिपाठी व्यायाम शाळे पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.जितेश गणेश ठाकरे यांचे निविदा रकमेइतकेचेच दर सर्वात कमीचे स्विकारुन रक्कम रु.१०,८६,५७३/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**मा.सभापती :-** सभा संपण्यापुर्वी मला मा.आयुक्त साहेबांना एक विनंती अशी करायची आहे. या कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सर्वेच महानगरपालिका आर्थिक अडचणी मध्ये आलेल्या आहे. आणि महसुल विभागाची वसुली होत नाही. घरपट्टी टॅक्स आपण ऑनलाईन वसुल करावा. ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाल्यामुळे कुठेतरी आपल्याकडे निधी यायला सुरुवात होईल. सभागृहामध्ये काही सभासदांना चांगले अनुभव आहे जे माजी महापौर पण आहे व माजी सभापती पण आहे. जसे आपले नितीन भाऊ लढढा आहे, सदाशिव ढेकळे, आपल्या ढेकळे दादा आहे, आज ते काही कारणामुळे उपस्थित नाही. ते सुध्दा जेष्ठ आणि अनुभवी सदस्य आहे. तर अशी जी सर्व गुण संपन्न मंडळी आहे. यात आमचे सुनिलभाऊ खडके आहे तर या सगळयांच्या सोबत एक मिटींग ठेवावी. यांच्याकडुन आपल्याला खुप चांगल्या चांगल्या सजेशन्स मिळतील या परिस्थिती मध्ये आपण आपल्या दालनात एक मिटींग घेऊन ही परिस्थिती नियंत्रणात आणणेसाठी जे गरजेचे आहे. ते करावे.

**मा.आयुक्त :-** अध्यक्ष महोदयांनी जे सुचविले त्याच्याशी मी सहमत आहे. पुढच्या आठवडयात आम्ही एक मिटींग आयोजित करु. आपले गटनेते आहे आपले पदाधिकरी यांचे सोबत तसेच आमचे अधिकाऱ्यांसोबत चर्चा करु व सर्व पदाधिकाऱ्यांकडुन जे काही सुचना येतील त्याचा तंतोतंत पालन करायचा प्रयत्न करु . जेणे करुन येणाऱ्या आर्थिक वर्षात अडचणी येणार नाही याची काळजी घेऊ.

**मा.सभापती :-** आपण सर्व प्रयत्न करु या.

**श्री.नितीन लढढा :-** उत्पन्नाच्या बाबतीत असे आहे की, घोडा घास से दोस्ती कर लेंगा तो खायेंगा क्या ? जर उत्पन्नच नसेल तर उद्या कर्मचाऱ्यांचे पगार अधिकाऱ्यांचे पगार देणेस सुध्दा त्रास होईल. ही एक प्राथमिकता आहे आणि अशीच एक प्राथमिकता आहे. नगररचनाकार, नगररचनाकार आज जवळपास दोन ते अडीच महिन्यापासुन पदावर नसल्याने नगररचना

विभाग एकदम वाऱ्यावर आलेला आहे. वास्तविक बघितल तर उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असलेला हा दोन नंबरचा विभाग आहे. ज्याच्यातुन आपल्याला वर्षाला ७-८ कोटी रु पये उत्पन्न प्राप्त होतो. गेल्या दोन महिन्यामध्ये दोन गोष्टी आहे. महानगरपालिकेच उत्पन्न बुडत आहे. दुसरा ज्यांच्या कोट्यावदी रूपये गुंतवणुकी झालेले आहे. ज्यांच्या बँका लोन द्यायला तयार आहे पण आपल्याकडुन कमप्लीशन मिळत नाही. कोणाला कामे सुरु करायचे आहे पण महानगरपालिके कडुन त्यांना परवानगी दिली जात नाही. याच्यामुळे अर्थ व्यवस्था आणि अश्या पध्दतीने जर आपले अधिकारी कामावर रु जु होत नसतील. मा.आयुक्त साहेबांशी माझ ४-५ वेळा बोलण झाल आणि त्यांनी मॅसेज कन्वे केला पवार साहेबांना, परंतु अश्या पध्दतीने जर कोणी अधिकारी स्वत:च्या जिवाला घाबरुन आपल्या कर्तव्यापासुन दुर राहत असेल. आज स्वत: आयुक्त साहेब कामावर आहे, उपायुक्त साहेब रु जु आहे. सगळे अधिकारी रु जु आहे. मग त्यांना रु जु व्हायला काय अडचण आहे. पुर्वी शासनाचे नियम होते ३३% चे पण आता पुर्ण संख्येत अधिकाऱ्यांनी उपस्थित राहायला पाहिजे. आणि फक्त एका व्यक्तीसाठी एक संपुर्ण विभागाची अर्थ व्यवस्था कोलमडली जाते आणि संपुर्ण गावातल बांधकाम क्षेत्र हे वेठीस धरले जात. हा अत्यंत चुकीचा प्रकार आहे. ते हजर होत नसतील तर शासनाला दुसऱ्या व्यक्तीची मागणी करावे. परंतु अस दोन दोन तीन तीन महिने एखादा विभाग ठप्प पडुन राहीन मला वाटत की, योग्य होणार नाही.

**मा.सभापती :-** नितीन भाऊ Exactly आपण जे मत मांडलेला आहे तेच मत मी पण मांडलेला आहे. आयुक्त साहेबांचाही हेच मत आहे त्यांनी पवार साहेबांना सुचना ही दिल्या होत्या. तरी ही ते रुजु झालेले नाही.

**मा.आयुक्त :-** आपण त्यांना सुचना दिल्या. त्यांच्याशी बोलणे ही झालेले आहे की, प्रकरण प्रलंबित आहे. परंतु त्यांनी सांगितले की, ते कंटेनमेंट झोन मध्ये असल्यामुळे मी येवु शकत नाही.

**मा.सभापती :-** कंटेनमेंट झोन असतांना सुध्दा ते येऊ शकता अशी ही तरतुद आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, या लॉकडाऊनच्या काळामध्ये ही अश्या काही लोकं आहे जे वर्षाच्या सुरुवातीलाच आपला निधी भरुन टाकता. आणि त्याला सुट मिळते म्युनिसिपल टॅक्स मध्ये. तर आपल्या माध्यमातुन आपण पुन्हा एकदा पेपरात डिकलेअर कराव. इतके लोक तयार आहे की, सी.ए. असेल डॉक्टर असेल म्हणजे ही मंडळी फोन करु न विचारते की आम्हाला याच्या बाबतीत स्पष्टीकरण हवं. की आम्हाला याच्या केव्हा पर्यंत कुठल्या तारीख पर्यंत याच्यावर टक्केवारी सुट मिळु शकेल. असा निर्देश जर तुम्ही प्रशासनाला दिल तर निधी सुध्दा चांगल्या प्रकारे येईल.

**मा.आयुक्त :-** ह्या सुचना योग्य आहेत. ते आपण देणार आहे. मुदत वाढविणेबाबत निर्णय घेता येईल. लॉकडाऊन उठल्यानंतर आपण त्यांना ठराविक मुदत देऊ. यात काय असत. बिल दिल्या नंतर बिलावर कालावधी नोंदविलेल असत की इतक्या कालावधीत कर भरल तर सुट मिळेल. लॉकडाऊन संपल्यानंतर या सर्व सुविधा दिले जातील आणि याची पुर्तता आपण करु.

**मा.सभापती :-** ऑनलाईन भरणा बाबत कार्यवाही करावी कारण खुप लोकं म्हणत आहे की, आम्ही ऑनलाईन भरायला तयार आहे.

**मा.आयुक्त :-** आता चेकसाठी प्रत्येक प्रभाग समितीच्या बाहेर आपण एक ड्रॉप बॅक्स लावणार आहे, त्यांचे पैसे जमा झाल्यानंतर त्यांना रिसिप्ट मिळुन जाईल आणि ऑनलाईनची सुविधाही आपण देणार.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** न सुचना देता न कळवता, डी.बी.जैन हॉस्पीटल येथील सुविधा बंद करण्यात आली, का बंद करण्यात आली ? सरकार म्हणत आहे बाहेरचे दवाखाने सुरु करा आणि त्यांनी आपलाच दवाखाना बंद करु न टाकला.

**डॉ.श्री.रावलाणी, वैद्यकीय प्रमुख :-** कोविड-१९ सेंटर, कॅरेंटाईन सेंटर आणि डी.सी.एस.सी. या ठिकाणी डॉक्टरांची डयुटी वर्ग झालेली आहे. पेशंटचे उपचाराचे काम, सॅम्पल घ्यायचे काम, रिपोर्ट बनविणेचे काम हे सर्व कामात डॉक्टर्स व्यस्त आहे. जो पर्यंत मला शक्य होत तो पर्यंत मी मॅटरनिटी होम चालु ठेवलं. बाकी सर्व सुविधा चालु आहे पण डॉक्टर्सचे आणि सिस्टर्सच्या अभावामुळे ते चालविणे शक्य होत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता पर्यंत हे जे बाया आलेल्या आहेत ओ.पी.डी.मध्ये तर ह्या बायांनी जायच कुठे,

**डॉ.श्री.रावलाणी, वैद्यकीय प्रमुख :-** त्यांची व्यवस्था गोदावरी हॉस्पीटल मध्ये केलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता चार ते पाच दिवस झाले तुमच ॲम्ब्युलन्स पण बंद आहे.

**डॉ.श्री.रावलाणी, वैद्यकीय प्रमुख :-** दुसरी गाडीची व्यवस्था केलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रभाग क्र.१ मधील एका बाईचा बाळ पोटातच वारला, कोण जबाबदार आहे सांगा तुम्ही.

**मा.सभापती :-** म.न.पा. दवाखान्यात जे महिला प्रस्तुतीसाठी येतात ते आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या दवाखान्यात येतात. जे गर्भवती महिला आहे त्यांना खाजगी दवाखाने सुध्दा घेत नाही. कारण भिती सर्वांनाच आहे. एका महिलेला घेऊन जातांना हॉस्पीटल दुर असल्यामुळे तिचा बाळ रस्त्यामध्ये पोटातच वारला इतकी दुरदैवीय घटना आहे ही. कारण ती वेळेत हॉस्पीटलला पोहचु शकली नाही. त्यामुळे यात काही मार्ग काढावा. गरीब लोकांची सोय करणेत यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला हे सांगायचे आहे की, फक्त जर १०-१५ लोकांचा स्टॉफ आहे तर हे कॅन्ट्रॅक्ट बेसीसवर का घेत नाही. कोरोनाचा आजार कुठ पर्यंत आहे ६ महिने ८ महिने तर ६ महिन्यासाठी तुम्ही घ्यायला पाहिजे कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर.

**मा.आयुक्त :-** हे दवाखाने सुरु करण्याची आपण तयारी केली होती. परंतु कोविड रुग्णा करीता आपल्याला सोय करावी लागत आहे. शाहु महाराज रुग्णालय व सिव्हील २७-२८ एप्रिल पर्यंत आडोक्यात होता. परंतु नंतर पेशंट वाढले आहेत. त्यामुळे गेरसोय होत आहे. सद्या आपल्या डॉक्टर कमी पडत आहे. आपल्या पुरेशे डॉक्टर मिळालेतर डी.बी.जैन हॉस्पीटल सुरु करता येईल. या मॅटरनिटीचे पेशंटला आपण गोदावरी येथे मोफत पाठवु शकतो तसेच खाजगी दवाखान्यात येथे आयुष्यमान भारत योजना लागु आहे तेथे पाठवता येईल.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** जेव्हा ही कोणत्याही प्रभागात कोरोना पेशंट मिळतो किंवा आढळतो सगळयात पहिले आपला कर्मचारी हा सर्वात आधि तेथे पोहचतो. सफाई कामगार, फवारणीवाले, आता शासनाने एक जी.आर. काढला आहे, ५० लाखाचा विमा काढण्याचा. तर तुम्ही तुमच्या वतीने पत्र देऊन हे सर्व लोक तेथे ॲड करावे असे तुमच्या स्तरावर तुम्ही शासनाला कढवावे. आणि दुसर औरंगाबाद महानगरपालिकेने एक निर्णय घेतलेला आहे की, जेवळेपण मेडीकल आहे त्यांना तुम्ही असे आदेश काढावे की, जे लोक सर्दी व खोकल्याचे गोळया घ्यायला येतात त्यांचा संपुर्ण पत्ता, नाव, मोबाईल नंबरची नोंद करावी असे आदेश करावे. असे केल्यास ती माहिती आपणास भरपुर उपयोगात येईल.

**श्री.नितीन लढढा :-** मुंबई महानगरपालिकेने सुध्दा असाच निर्णय घेतलेला होता. खोकलेचा औषध किंवा सर्दीचा औषध घेऊन तो रुग्ण १४ दिवस काढतो आणि तो पॉझिटीयु होऊन त्याच प्रसार करतो. आणि अशी अवस्था झाल्यावर तो रुग्णालयात येतो. तो पर्यंत त्याची लागन ही समाजात मोठया प्रमाणावर लागलेली असते. त्यावर खबरदारी म्हणुन मुंबई महानगरपालिकेने सुध्दा असा निर्णय घेतलेला आहे.

**मा.आयुक्त :-** आता ज्या विम्याबद्दल बोलत होते. त्यामध्ये शासनाने डॉक्टर्स, मेडीकल वर्कर्स आणि आशा कर्मचारी हेच घेतलेले आहे. आता त्यात सफाई कर्मचारी हे सुध्दा आरोग्य कर्मचारी आहेत, स्वच्छता कर्मचारी हा सुध्दा आरोग्य कर्मचारीच आहे त्यामुळे त्यांचा समावेश करणेकरिता शासनास त्यांची माहिती देत आहोत.

**श्री.नितीन लढढा :-** इन केस काही कारणाने हे विमा शासनाकडुन नाही होऊ शकला तर महानगरपालिकेने काही तरी एक योग्य प्रमाणाचा तरी विमा या कर्मचाऱ्यांना जे डायरेक्टली त्यांच्याशी अटॅच होतात या सेवेशी. तश्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीच तशी कुठलीतरी पॉलिसी फिक्स करावी. कारण काही तरी आधार त्याच्या कुटुंबाला आपण आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातुन देऊ शकतो. अश्या पध्दतीने एखादी पॉलिसीची निवड करावी किंवा काही कंपण्यांशी चर्चा करावी. राज्य शासन देत असेल तर उत्तमच आहे. मग आपल्याला त्यात भाग घेण्याची गरज नाही. परंतु काही कारणाने राज्य शासनाच्या पॉलिस्या विलंब होत असेल किंवा राज्य शासनाकडुन महानगरपालिका कर्मचारी बाबत निर्णय घेता येत नसेल तर महानगरपालिकेने आपली जबाबदारी समजुन यांना न्याय मिळवुन देण्याच्या संदर्भात काही तरी केले पाहिजे.

**मा.आयुक्त :-** यांच्या पॉलिसीबाबत आपण काही ठाराविक ४ महिने ६ महिनेच्या कालावधीसाठी आपण प्लॅन मागवु या आणि त्याच्यानंतर ते सभेत ठेवुन त्यांची पॉलिसी बाबत विचार करुन निर्णय घेऊ या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्तांनी ही जी सुची मागवली होती तेवढी फॅक्स करुन पाठविणेची व्यवस्था करावी.

**मा.आयुक्त :-** मान्य.

**श्री.चेतन सनकत :-** आपण ज्या बँकेत मजुरांची, कर्मचारी, अधिकाऱ्यांची पगार करतो त्या बँकांनी ही कर्मचाऱ्यांचे विमे काढणे बंधनकारक असत अशी मला माहिती मिळालेली आहे. आज पर्यंत अस बँकेच विमा कोणालाच भेटलेला नाही. असे काही नियम आहे मला वाटत की, ज्या बँकेत आपले सॅलेरी अकाऊंट आहे त्या बँकेने कर्मचाऱ्याला विमा देणे बंधनकारक आहे.

**मा.आयुक्त :-** तपासुन सांगतो.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपण आता जे रोजंदारीवर साफसफाई कर्मचारी लावले आहे त्यांची ही विमा पॉलिसी काढावी.

**मा.सभापती :-** नगरसचिव सर्व संमतीने राष्ट्रगीत न घेता नियमीत पुढील सभेला सरुवात करण्यात यावी व पुढील सभा संपल्यानंतर राष्ट्रगीत घेण्यात यावा.

मा.सभापती यांचे निर्देशानुसार सभा संपली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**